| MHAU030306912024 | दाखल दिनांक | : | १२.१२.२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १२.१२.२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०५.०८.२०२६ |
| | कालावधी ०१ व.०७ ९म.२४दि. | | |

**औरंगाबाद येथील ६ वे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी–** (पिठासीन अधिकारी के.एन. गोवरीकर)

(घोषीत दिनांक – ०५.०८.२०२६)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२८२४/२०२४** **निशाणी क्रं. २३**

गु.र.नं.२४१/२०२४

पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद.

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस ठाणे, छावणी,<br>औरंगाबाद. |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री.पी.एस.कच्छवे |
| आरोपी | **१. गौरव मधुकर वाघमारे,**<br>वय – २२ वर्षे, धंदा – खा.नोकरी,<br>रा. जोगवाडा, जटवाडा, हर्सुल, औरंगाबाद.<br>**२. विनोद मधुकर वाघमारे,**<br>वय – २२ वर्षे, धंदा – खा.नोकरी,<br>रा. जोगवाडा, जटवाडा, हर्सुल, औरंगाबाद.<br>**३. रोनित पुंडलिक बनसोडे,**<br>वय – २२ वर्षे, धंदा – खा.नोकरी,<br>रा. जोगवाडा, जटवाडा, हर्सुल, |

| | |
|---|---|
| | औरंगाबाद. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री.व्ही.बी.साळुंके |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०६.०५.२०२४ |
| दोषारोपत्राचा दिनांक | ३०.११.२०२४ |
| दोषारोपत्र ठेवल्याचा दिनांक | ०७.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२४.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०५.०८.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | – |

**आरोपीचा तपशील**

| आरोप ीचे श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधि–नियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | गौरव मधुकर वाघमारे<br>विनोद मधुकर वाघमारे<br>रोनित पुंडलिक बनसोडे, | दि. २९/०५/२०२४ | दि. ०३/०६/२०२४ | भा.द.वि. कलम ३८०, ४५७, ३९२, २०१ सह कलम | निर्दोष मुक्त केले. | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३४ अन्वये | | | |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | रोहित शिवाजी पाटील | फिर्यादी |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२५ | फिर्याद वरील स्वाक्षरीस. |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**– न्यायनिर्णय –**

(घोषित दिनांक –०५.०८.२०२६)

आरोपींविरुध्द कलम ३८०, ४५७, ३९२, २०१ सह कलम ३४ भारतीय दंडविधान संहीता (या पुढे भा.दं.वी. असे संबोधले जाईल) अन्वये दोषसिध्दीसाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथनः–**

२. दिनांक ०६.०५.२०२४ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास आरोपीतांनी संगणमत करुन आरोपी क्र.२ यास हॉटेल बाहेर थांबवुन आरोपी क्र.१ व ३ यांनी हॉटेलमध्ये जावून साक्षीदार शंकरराव बाबंल यांचे हात, पाय, तोंड चिकट टेपने बांधुन बनावट पिस्टलचा धाक दाखवनु बळजबरीने हॉटेलचे ऑफीसचे लॉक तोडून ऑफिसमधील कॅश काऊंटर मधील रोख रक्कम दिड लाख रुपये व १० मोबाईल फोन

असे चोरुन घेवुन गेले व गेलेल्या माला पैकी २ मोबाईल व रोख रक्कम रु.४०,०००/- मिळुन आलेली असुन आरोपींनी उरलेले ८ मोबाईल फोन कोठेतरी फेकुन देवून व रोख रक्कम १,१०,०००/- रुपये खर्च करुन विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट केला. आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरुद्ध गुन्हा रजि.नं.२४१/२०२४ ३८०, ४५७, ३९२, २०१ सह कलम ३४ भारतीय दंडविधान संहीता अन्वये नोंदवण्यात आला. तपासिक अंमलदार यांनी गुन्ह्याचे तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा, अटक पंचनामा केला आणि तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी १२ वर कलम ३८०, ४५७, ३९२, २०१ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहीता अन्वये आरोप निश्चीत केले व आरोपीस वाचुन दाखवले असता आरोपीने गुन्हा नाकबुल केला व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. म्हणून सदरचा खटला पुढे चालविण्यात आला.

५. सरकारी वकीलांनी तोंडी अभियोग पक्षाचा पुरावा संपला असे सांगितल्याने अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही. तसा निशाणी १ वर आदेश पारित करण्यात आला आहे.

६. एकंदर अभिलेखावरील पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले असता व दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझे निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्याचें निष्कर्ष मी कारणांसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०६.०५.२०२४ रोजी रात्री ०१.०० ते पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास वुडलॉट हॉटेल, पडेगाव औरंगाबाद येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी चोरीचा गुन्हा करण्याचा हेतूने फिर्यादीच्या दुकानात लपून प्रवेश केला व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ४५७ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही |
| २. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीच्या दुकानातले १० मोबाईल व रोख रक्कम चोरली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३८० सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या घरातुन फिर्यादीचा हॉटेलमधील मोबाईल आणि रोख रक्कम जबरदस्तीने घेवुन गेले व त्यायोगे भा.द.वि. कलम ३९२ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने आरोपींनी १० मोबाईल पैकी ८ मोबाईल कोठेतरी फेकले व रक्कम रु.१,१०,०००/- खर्च करुन विल्हेवाट लावून पुरावा नष्ट केला व त्यायोगे भा.द.वि. कलम २०१ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | नाही. |
| ५. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची निर्दोष |

| | | |
|---|---|---|
| | | मुक्तता. |

## का र ण मीं मा सा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :–**

७. मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्र चर्चेस घेत आहे. दिनांक ०६.०५.२०२४ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास आरोपीतांनी संगणमत करुन आरोपी क्र.२ यास हॉटेल बाहेर थांबवुन आरोपी क्र.१ व ३ यांनी हॉटेलमध्ये जावून साक्षीदार शंकरराव बाबंल यांचे हात, पाय, तोंड चिकट टेपने बांधुन बनावट पिस्टलचा धाक दाखवनु बळजबरीने हॉटेलचे ऑफीसचे लॉक तोडून ऑफिसमधील कॅश काऊंटर मधील रोख रक्कम दिड लाख रुपये व १० मोबाईल फोन असे चोरुन घेवुन गेले व गेलेल्या माला पैकी २ मोबाईल व रोख रक्कम रु.४०,०००/– मिळुन आलेली असुन आरोपींनी उरलेले ८ मोबाईल फोन कोठेतरी फेकुन देवून व रोख रक्कम १,१०,०००/– रुपये खर्च करुन विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, वरील कलमांचे प्रमुख घटक आरोपीविरुध्द सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे.

८. साक्षीदार क्र.१ फिर्यादी रोहीत शिवाजी पाटील यांच्या पुराव्यात असे आले की, त्यांचा वडीलांचा हॉटेलचा व्यवसाय आहे. ते त्यांना हॉटेलच्या व्यवसायात मदत करतात. त्यांचा हॉटेलचे नाव वुडलॉट गार्डन रेस्टॉरंट असे आहे. हॉटेल पडेगावला आहे. घटना काय झाली हे त्यांना आठवत नाही, पण चोरी झाली होती हे त्यांना मॅनेजरने त्यांना कळवले होते. त्यांनी हॉटैलवर जावून पाहणी केली होती. हॉटेलचे सामान अस्त्यव्यस्त होते. कॅमेरे तोडलेले दिसले व मोबाईल व पैसे चोरीला

गेलेले दिसले. त्यांनी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याचे कथन केले. तसेच त्यांनी फिर्यादवरील सही ही त्यांची असल्याचे मान्य केले. परंतु त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले.

**९.** सदर साक्षीदारांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे कोठेही कथन केले नाही की, आरोपी क्र.१ व ३ यांनी हॉटेलमध्ये जावून साक्षीदार शंकरराव बाबंल यांचे हात, पाय, तोंड चिकट टेपने बांधुन बनावट पिस्टलचा धाक दाखवनु बळजबरीने हॉटेलचे ऑफीसचे लॉक तोडून ऑफिसमधील कॅश काऊंटर मधील रोख रक्कम दिड लाख रुपये व १० मोबाईल फोन असे चोरुन घेवुन गेले.

**१०.** अभिलेखावरील पुराव्याचे विवेचन करता असे दिसून येते की, फिर्यादी हा त्यांच्या फिर्यादप्रमाणे सांगत नाही. त्यामुळे सदर गुन्ह्याची फिर्याद पुरावा कायद्याप्रमाणे सिद्ध झालेली नाही. प्रस्तुत प्रकणात इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही, तसेच पंच साक्षीदार देखील तपासण्यात आलेले नाही. याउलट फिर्यादी यांनी निशाणी १४ वर पुरसीस दाखल करुन हे मान्य केले आहे की, त्यांची व आरोपी यांची तडजोड झालेली आहे. त्यांना आरोपीविरुध्द कोणतेही तक्रार नाही. एकंदरीतच आरोपी व त्यांचे न्यायालयाबाहेर आपसात मिटल्याचे त्यांनी मान्य केले. अभिलेखावर असलेला एकूण पुरावा आरोपीस शासन करण्यास पुरेसा नाही. म्हणून मुद्दा क्र.१ ते ४ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता:</u>**

**११.** फिर्यादीने सरतपासणीमध्ये दिलेले कथन त्याच्या फिर्यादमधील कथनाशी विसंगत आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द खोटा पुरावा दिल्याबाबत कार्यवाही करणे योग्य वाटत नाही. मुद्दा क्र.५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१. गौरव मधुकर वाघमारे, आरोपी क्र.२. विनोद मधुकर वाघमारे व आरोपी क्र.३.रोनित पुंडलिक बनसोडे, यांना फौजदारी प्रक्रीया संहीताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहीताचे कलम कलम ३८०, ४५७, ३९२, २०१ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहीता प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्त करत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीता चे कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन द्यावा.

३. आरोपीचे जामीन व कदबे रद्द करण्यात येत आहेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KETAKI NAMA GOWARIKER
Date: 2026.08.06 11:10:54 +0530

(श्रीमती के.एन.गोवारीकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.६, औरंगाबाद.

दि. ०५.०८.२०२६